# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI
## National Service Scheme

**Prof. Shashikant Gedam**
**District Prog. Coordinator**

M.G. College, Armori
**Email :** dr.shashigedam@ rediffmail.com
9423422000

पत्र क्र. /NSS/ 01 /2016

**Dt: 24/08/2016**

प्रति,

मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी
गोंडवाना विद्यापीठ संलग्नित रासेयो महाविद्यालये,
गडचिरोली जिल्हा.

विषय:– राष्ट्रीय/राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन रासेयो पथसंचलन जिल्हा स्तरीय निवड शिबीर – गडचिरोली जिल्हा.

मा. महोदय,

उपरोक्त विषयानुषंगाने गडचिरोली जिल्ह्यातील रासेयो अंतर्गत कार्यरत असलेल्या सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, २६ जानेवारी, २०१७ ला भारतीय प्रजासत्ताक दिनी दिल्ली तथा मुंबई येथे होणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजना पथकांच्या पथसंचलनामध्ये सहभागी होण्यासाठी गडचिरोली जिल्ह्यातील रासेयो स्वयंसेवकांची निवड करावयाची आहे. याकरीता **महिला महाविद्यालय, गडचिरोली येथे दि. ०८ सप्टेंबर, २०१६ रोज गुरुवारला स. ११.०० वाजता** जिल्हास्तरीय निवड शिबीर आयोजित करण्यात आले आहे. सदर शिबीरामध्ये सहभाग घेण्याकरीता आपल्या महाविद्यालयातील ०२ मुले व ०२ मुली पाठविण्यात यावे.

स्वयंसेवक/स्वयंसेविका पाठवितांना **रासेयो पुस्तिकेतील पान क्र. १४ व १५ वर** दिलेल्या नियम व अटींचे काटेकोर पालन करावे. तसेच प्रत्येक स्वयंसेवकांची माहिती **कार्यपुस्तिकेतील पान क्र. २४ नुसार** दिलेल्या प्रपत्रामध्ये भरुन पाठवावी. सदर शिबीरामध्ये सहभाग घेणाऱ्या स्वयंसेवक/स्वयंसेविका यांनाच विविध राष्ट्रीय तथा राज्यस्तरीय शिबीरे तसेच आव्हान – २०१७ करीता गडचिरोली जिल्ह्याच्या रासेयो चमूचे गठन करण्यात येणार असल्याने स्वयंसेवक/स्वयंसेविका पाठवितांना पुरेपूर काळजी घेण्यात यावी.

अधिक माहितीकरीता गडचिरोली जिल्हा रासेयो समन्वयक प्रा. शशिकांत गेडाम यांचेशी ९४२३४२२००० यावर संपर्क साधवा.

प्रा. शशिकांत गेडाम
गडचिरोली जिल्हा रासेयो समन्वयक